Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 864 – 867
DOI: 10.5281/zenodo.10281769

Original Research Article

# महात्मा गांधी यांचे सत्याग्रहासंबंधी विचार

वर्षा भूषण कांबळे

संशोधक विद्यार्थिनी, उदगीर ता. उदगीर जि. लातूर ४१३५१७ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: kamblevarsha764@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

**प्रस्तावना**

आज आधुनिक काळात राष्ट्राच्या सर्वांगीण विकासात अनेक महापुरुषांचे विचार मार्गदर्शक व दिशादर्शक ठरले आहेत. यामध्ये राष्ट्रपिता म.गांधी यांच्या विचारांचा आवर्जुन उल्लेख करता येईल. गांधीजींच्या मते, अहिंसा हे मानवाचे सर्वश्रेष्ठ कर्तव्य असते. अवतीभवती भयानक हिंसेचे वातावरण असताना गांधीजींनी शस्त्राचे दौर्बल्य अचूक ओळखले आणि अहिंसेतच मानवमुक्तीचा मार्ग असल्याचे सांगितले. गांधीजींच्या मते, कोणालाही क्रोधासाठी व स्वार्थासाठी हेतूपूर्वक ठार मारणे किंवा इजा करणे ही जशी हिंसा आहे तशीच कुणाविषयी मनात दुष्ट भावना बाळगणे वा कोणालाही विचारानी, शब्दांनी वा कृत्यांनी दुखापत करणे ही सुद्धा हिंसा आहे. अहिंसेला गांधीला आत्मीक शक्ती म्हणतात. पाशवी शक्तीचा प्रतिकार करणे हे काम ते तिच्यावर सोपवितात. पण याखेरीज अहिंसेला गांधीजींच्या दृष्टीने एक सकारात्मक कार्यही असते. ते म्हणजे प्रेम सौहार्दावर आधारित नवसमाजाची उभारणी करण्याची केवळ गरज म्हणून गांधीजींनी अहिंसेचा पुरस्कार केलेला नव्हता. ती त्यांच्या मनाची प्रामाणिक श्रद्धा होती. म.गांधींना अभिप्रेत असणारी अहिंसा दुबळ्या माणसाची पलायनवादी अहिंसा नव्हती तर ज्याला स्वतःचा आत्मिक अध्यात्मिक सामर्थ्याची यथार्थ जाणीव झालेली आहे असा शुरवीराची ती अहिंसा होती. भेडक माणूस अहिंसक होवूच शकत नाही.

सत्याग्रहाच्या रुपाने गांधीजींनी जे सामुहिक लढ्याचे तंत्र दिले आहे ते माक्र्सच्या वर्गसंघर्षापेक्षा अनेक बाबतीत निराळे आहे. सत्याग्रह ही विशिष्ट वर्गाची वृत्ती नाही. केवळ वर्गजागृत व संघटित कार्यकर्ते सत्याग्रहासाठी पुरेसे नाही तर त्यापेक्षा अधिक कठोर शिस्तीची, संयमाची व तयारीची गरज सत्याग्रहासाठी असते. एखाद्या घटनेची प्रासंगिक प्रतिक्रिया म्हणजे सत्याग्रह नव्हे. दुसरे असे की, सत्याग्रहाने विचार आणि कृती या दोहोत अहिंसक असलेच पाहिजे.

कारण गांधी विचारात त्या दोन्ही अद्वैत अभिप्रेत असते. सत्याग्रहाचे पर्यवसान झुंडशाहीत कधीच होऊ शकत नाही. कारण सत्याग्रह व झुंडशाही या परस्पर विरुद्ध प्रतिक्रिया आहेत. झुंडीत व्यक्तीचे अधःपतन होते तर सत्याग्रहात तिचे नैतिक उन्नयन होते.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. म.गांधीजींचे अहिंसा व सत्याग्रह विषयक विचारांचा अभ्यास करणे.

२. आधुनिक काळात अहिंसा व सत्याग्रह या दोन तत्त्वांची प्रासंगिकता अभ्यासणे.

**म. गांधींचे सत्याग्रहासंबंधी विचार**

राज्यसंस्थेने अन्याय केला तर एखाद्या व्यक्तीने किंवा अन्याय पिडीत लोकसमुहाने त्याचा प्रतिकार करून न्याय प्रस्थापित कसा करावा याचा सम्यक मार्ग गांधीजींनी जगासमोर प्रत्यक्ष प्रयोग करून सादर केला. गांधीजींच्या पुर्वकाळात अन्यायाचा प्रतिकार करण्याचे मार्ग हे व्यक्तीच्या वा लोकसमुहाच्या मानसिक शक्तीवर फारसा कोणाचा विश्वास नसे. अन्याय झाला तर परमेश्वराची इच्छा, पुर्वजन्मीच्या कर्माचे फळ म्हणून अन्याय सहन करावयाचा अशीच सर्वसाधारण शिकवण होती आणि लोकही त्यानुसारच खरे मानीत. तर दुसरा मार्ग हा अन्यायाचा बदला घेण्याचा होता. आपल्यावर अन्याय करणा-याचा बदला व्यक्ती अन्याय करणा-याचा सूड घेवून किंवा त्याचा खून करून घेत असे. प्रस्थपित कायद्यानुसार अशी व्यक्ती गुन्हेगार ठरत असे आणि कायद्यानुसार त्याला शिक्षाही होत असे. काही वेळा अशा व्यक्ती पळून जावून स्वतंत्र टोळया बनवत असे. असा अन्याय झालेले अनेक जण अशा टोळयात सामील होत असत. अशा टोळयांनी काही प्रमाणात अन्याय करणा-यावर दहशत निर्माण करण्याचे कार्य केले. पण यामुळे समाजपरिवर्तन होवू शकले नाही. उलट समाजातील शोषणपद्धती जशीच्या तशी राहिली व कायदा हातात घेतला म्हणून संपूर्ण राज्यव्यवस्था त्यांच्या विरोधात गेली. कायदे बदलले पाहिजेत असा विचार त्यांच्या लक्षात आला नाही. ज्यावेळी लोकसमुहावर अन्याय झाले त्यावेळी लोकांनी एकतर अन्याय निमूटपणे सहन केला किंवा सशस्त्र उठाव करण्याचे प्रयत्न केले. कारण उठावापेक्षा राज्यसंस्थेची ताकद नेहमी मोठी असते. लोकसमुह सशस्त्र संघर्षाला जेव्हा तयार होतो तेव्हा अधिक हिंसक पद्धतीने त्याला संघर्षाला चिरडून टाकण्याची आयती संधी राज्यसंस्थेला प्राप्त होते. ज्या लोकसमुहाच्या उठावाला परदेशातून भरीव निधी शस्त्रास्त्रे, प्रशिक्षण दिले जाते ते उठाव बहुतांशी यशस्वी होताना दिसून आले. पण समस्या त्याच असतात. त्यात बदल होत नाही. कारण अन्याय करणारे बदलतात पण अन्याय तसाच राहतो.

अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी शस्त्र हाती घेणे हे सर्वसामान्य लोकांना शक्य नसते. तसेच जो शस्त्रास्त्राने इतरांचा संहार करतो त्या शस्त्रानेच त्याचा नाश होतो. शस्त्रास्त्रांच्या वापरामध्ये ज्याकडे अधिक प्रभावी सस्त्रात्रे असतात त्याचाच विजय होतो. म्हणजे न्याय अन्यायाच्या लढ्यात न्यायाचाच विजय होईल याची खात्री नसते. तर ज्या बाजूकडे अधिक संहारक शस्त्रे असतील त्याचाच विजय होतो. अन्यायाचा प्रतिकार करणा-यासाठी गांधीनी जो मार्ग सांगितला तो भारतीय जतनेने स्वातंत्र्यलढ्यात तर उपयोगात आणलाच पण गांधीच्या मार्गाचा अवलंब जगात अनेक देशातील जनतेने

केला. मार्टिन ल्यूथर किंग (ज्यू.) नेल्सन मॅंडेला ही दक्षिण आफ्रिकेतील वंशभेदाच्या अन्यायाविरुद्ध शांततापूर्ण संघर्षाची ठळक उदाहरणे आहेत.

**सत्याग्रहाची तत्त्वे**

- सत्याग्रहाचा मुख्य हेतू घटना किंवा प्रश्नामागील सत्याचा शोध घेणे हा असला पाहिजे. अन्यायाचा प्रतिकार हा सत्याग्रहाचा आत्मा आहे. हा प्रतिकार दमन, शोषण यांच्या विरोधात असला पाहिजे. सत्याग्रह हा न्याय व खरेपणावर आधारला पाहिजे.
- माणसाने याचा वापर केवळ न्याय कारणासाठी केला पाहिजे.
- यात शारीरिक वा अन्य बळापेक्षा आत्मबलाला अधिक महत्त्व दिले पाहिजे. सत्याग्रहात हिंसा टाळली पाहिजे पण लढणे मात्र टाळता कामा नये.
- याउलट यात धैर्य, धीर, प्रेम व नीतीने सतत लढणे अभिप्रेत असते.
- सत्याग्रहाचा वापर करताना सत्याग्रहीनी विरोधकाबद्दल आदरभाव व सहानुभूती ठेवली पाहिजे.
- यात अन्याय व जुलूम करणा-या विरोधकांच्या हृदयपरिवर्तनावर भर दिला पाहिजे. हे हृदयपरिवर्तन उत्स्फूर्तपणे व ऐच्छिकरीत्या हिंसा टाळून स्वतः क्लेश सहन करून व शुद्ध साधनांचा वापर करावा. त्यागात जिंकण्याची शक्ती असते. हे सत्याग्रहीला समजले पाहिजे.
- सत्याग्रहात निःस्वार्थ कृती व विश्वास याला महत्त्व आहे.
- मनुष्य मुळात चांगला असतो. तो बदलू शकतो आणि सर्व प्रश्न वा संघर्ष अहिंसेने सुटू शकतात यावर सत्याग्रहीचा विश्वास असला पाहिजे.
- सत्याग्रहात शिस्तीला महत्त्व असते.
- सत्याग्रहींनी त्यांच्या नेत्यांनी दिलेल्या आदेशाचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे.
- सत्याग्रतहात निष्क्रीयतेला नव्हे तर सक्रियतेला महत्त्व असते.
- सत्याग्रह नेहमी नव्हे तर प्रसंगानुसार करावा.

म.गांधीजींच्या मते, सत्याग्रहात प्रतिकारासोबत विधायक कार्याला महत्त्व दिले पाहिजे. विधायक कार्यक्रम प्रस्थापितांचे हित रक्षण करणारा नव्हे तर सामान्यांच्या मूलभूत गरजांची पुर्तता करणारा असावा. सत्याग्रहीला पराजय माहित नसतो. सत्याग्रहातून जे मिळविले जाते ते सत्याग्रहाद्वारेच टिकविले पाहिजे. त्यांच्या मते, कोणताही सत्याग्रह या तत्वाचे पालन करून केला पाहिजे. तरच तो यशस्वी होतो.

म.गांधीजींच्या मते, सत्याग्रह हे विचार व कृतीत परावर्तित करण्याचे माध्यम असते. त्यामुळे विचार व कृतीत अंतर कमी करता येते. विचार प्रत्यक्ष कृतीत आणण्याची म.गांधींना सवय होती. सत्याग्रही हा सत्याचा उपासक असला पाहिजे. त्यांनी अहिंसा धोरण म्हणून नव्हे तर तत्त्व म्हणून स्वीकारली पाहिजे. त्याचा प्रतिपक्षाच्या सज्जनतेवर व

चांगुलपणावर विश्वास असला पाहिजे. त्यांनी प्रतिपक्षाचा राग व छळ सहन केला पाहिजे. त्यांनी प्रतिपक्षाची बदनामी वा निंदानालस्ती करता कामा नये. त्यांनी प्रतिपक्षाचा प्रतिकार असत्याचा सत्याने उद्दामपणाचा सौजन्याने, उन्मतपणाचा नम्रतेने व दुष्कर्माचा चांगल्या कर्माने केला पाहिजे. वाईटाशी वाईट मार्गाने लढण्यापेक्षा चांगल्या मार्गाने लढणे हिताचे असते. त्यांनी प्रतिपक्षाशी विरोध न करता नीतीमत्तेला व समाज हिताला घातक असणा-या प्रवृत्तीचा विरोध केला पाहिजे. त्यांनी स्वतःच्या विरोधी असणा-या व्यक्तीला राष्ट्राचे शत्रू मानता कामा नये. त्याच्यात विरोधकाची मते ऐकून घेण्याची सहनशीलता व सहिष्णूता असली पाहिजे.

**समारोप**

सत्याग्रह ही म.गांधीनी केवळ भारतीयांनाच नव्हे तर संपूर्ण मानवजातीला दिलेली महत्त्वाची व अनमोल देणगी आहे. सत्याग्रह फक्त नकारात्मक नव्हे तर सकारात्मक संकल्पना आहे. सत्याग्रहात अन्याय निवारण्याची प्रचंड शक्ती आहे. यामुळे अन्याय करणा-या व्यक्ती व समाजव्यवस्था यांच्यावर अंकुश ठेवता येतो. सत्याग्रहाच्या माध्यमातून समाजाचे प्रश्न सार्वजनिक लोकांमध्ये अन्यायासंबंधी व त्यांच्या ख-या समस्यांसंबंधी ज्ञान व जाणिवा वाढवितात. यामुळे ते अन्यायाच्या विरोधात लढ्यास तयार होतात. त्यामुळे सत्याग्रहाचा आशय नीट समजून घेऊन बदलत्या काळात त्याला नवीन आयाम देऊन त्याचा वापर केल्यास सत्याग्रह अन्याय निवारण्याचे शस्त्र म्हणून फारच उपयुक्त आहे. देशातील सध्या निर्माण झालेले वाढते तंटे, बेरोजगारी, युद्ध, दारिद्र्य इ. समस्यांचे उच्चाटन करण्यासाठी म.गांधीजींच्या अहिंसा, सत्याग्रह या साधनांचा अधिकाधिक उपयोग हा शासन, प्रशासन, समाज व इतर घटकांनी करणे अत्यंत आवश्यक आहे.

**संदर्भ सूची**


१. Parihar A.K.S., Mahatma Gandhi and his social work, Swastik Publication, New Delhi, 2014

२. कुंभार नागोराव, महात्मा गांधीजींचे सामाजिक तत्त्वज्ञान, अरुणा प्रकाशन, लातूर, 2012

३. कुंभार नागोराव, महात्मा गांधी: विचारदर्शन, प्रबोधन प्रकाशन, लातूर, 1995

४. भोळे भास्कर लक्ष्मण, भारतीय राजकीय विचारवंत, पिंपळापुरे बुक्स डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर, 2011